# आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा 'कॅम्पस'; के. के. वाघ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची निवड

प्रतिनिधी | नाशिक

शहरातील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत कंपन्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले होते. त्यात २५ विद्यार्थ्यांना संधी करिअरची मिळाली.

कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये इमरसन, जिंदाल सॉ, फॉक्स इंडिया, फौरेकिया इंटेरियर, केएसबी पंप, टोरंट पॉवर, महिंद्रा ॲण्ड महिंद्र अशा कंपन्यांनी सहभाग घेतला होता. मुलाखतीसाठी विविध विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रारंभी मुलाखतीमध्ये टेक्निकल टेस्ट आणि नंतर वैयक्तिक मुलाखत फेरी घेण्यात आली. शेवटी २५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येवून त्यांना ३३५ लाखापर्यंत वार्षिक वेतन देण्यात आले.

ईमरसनमध्ये - २, जिंदाल सॉमध्ये ५, फॉक्स इंडिया- ४, फौरेकिया इंटेरियर - ५ , केएसबी पम्पस - २, टोरंन्ट पॉवर - ६ व महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीत एका विद्यार्थ्यांची निवड झाली. या विद्यार्थ्यांचे वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेव होळकर, अशोक मर्चंट, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. प्रीती भामरे, डॉ. डी. एम. चांदवडकर, प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्या के. के. वाघ कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमवेत उपस्थित संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य व कंपन्यांचे प्रतिनिधी.

दै. दिव्य मराठी, दि. २२-०६-२०१७